# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ११.०१.२०२५

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १०/०१/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,७०,७५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१०/०१/२०२५ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण २,३५०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि १०/०१/२०२५ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण १,०५,०८०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध्द दि १०/०१/२०२५ पोस्टे हटटा जि हिंगोली येथे फिर्यादी गणेश साहेबराव दळवी वय ३५ वर्ष व्य.नौकरी पोशि/९१२ ने.पोस्टे वसमत शहर तैनात उपविपोअ कार्या. वसमत मो.नं. ७९७२७३०८१४ यांनी कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं २०२३ सहकलम ४८(७)(८) गौण खनिज अधिनीयम अन्वये **मि.माल:**—१)४,००,००० एक महिंद्रा अर्जुन कंपणची ट्रॅक्टर हेड विना नंबर चेसीस नं. MBNBEBBBNCK०३६४१ असा २) १००००० रू एक लाल रंगाची विन नंबर ट्रॅक्टर ट्रॉली ३)एक ब्रास रेती कि.६००० रू असा एकुण ५,०६,००० रू चा मुद्देमाल नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करून बेकायदेशीर रित्या शासनाचा महसुल बुडवुन अवैधरित्या पुर्णा नदीचे पात्रातुन गौण खनिज वाळु उत्खनन करून तिची चोरटी वाहतुक करीत असतांना ट्रॅक्टर व १ ब्रास वाळु असा एकुण ५,०६,००० रू मुद्देमाला सह मिळुन आला म्हणुन गुन्हा.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १०/०१/२०२५ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द कलम २८५ भादंवि अन्वये एकुण १९ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.